# शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई

(नोंदणी क्र. बी.ओ.एम./आर.एस.आर./एस. १८६२-१९८२)

नोंदणीकृत कार्यालयः २१९/३१११, टागोरनगर ग्रुप नं. १, डॉ. आंबेडकर चौक, स्टेशन रोड, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३

प्रशासकीय कार्यालयः १, जय टॉवर, पहिला मजला, पुंजानी इस्टेट समोर, कॅडबरी जंक्शन, खोपट, ठाणे (प.) ४००६०१

## ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुधारीत नोटीस सन २०१९-२०२० (फक्त सभासदांकरीता)

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची अडतीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २१ मार्च २०२१ रोजी सकाळी ९.३० वाजता सेंट लॉरेन्स हायस्कुल, रोड नं. ०३, व्ही.बी. फडके मार्ग, वागळे इस्टेट,ठाणे (प), ४००६०४. येथे सभासदांच्या सहभागाद्वारे (कोविड -१९ च्या नियमांचे पालन करुन) आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेची व विषयांची माहिती आपणांस दि. ०६ मार्च २०२१ रोजीच्या नोटीसद्वारे तसेच त्याच तारखेस दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रा मध्ये नोटीस प्रकाशित करुन कळविण्यात आले होते. परंतू यंदाच्या कोवीड -१९ च्या पार्श्वभुमीवर शासनाच्या निर्देशांचे पालन करणेकरीता तसेच महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभागाच्या दि. ०८ मार्च २०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उपरोक्त नमुद केलेल्या दिनांक, वेळ व स्थळी व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे होणार आहे. सदर सभेस सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. तरी संस्थेच्या ३१ मार्च २०२० किंवा त्यापुर्वीच्या सर्व सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये भाग घेण्याकरीता आपले नाव, पत्ता, सभासद क्रमांक, मोबाईल क्रमांक, व ई मेल आय. डी संस्थेच्या **shares@shivkrupa.in** व **whatsapp** क्रमांक ९३२४९४४०६२ वर दिनांक १५.०३.२०२१ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत नोंदवावे हि विनंती. यामुळे संस्थेच्या सर्व सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर वर व्हीसी / ओएव्हीएम द्वारे (**Other Audio Visual Means**) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुचना विनाव्यत्यय पाठवणे सुलभ होईल. सभेपुर्वी दिनांक १९.०३.२०२१ रोजी सभेची लिंक सभासदांना पाठविण्यात येईल. तरी या सभेस सभासदांनी सभेच्या नमुद वेळेच्या १५ मिनीटे पुर्वी संस्थेने पाठविलेल्या लिंक वर जॉईन होवून आपला सहभाग दयावा हि विनंती.

**ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जाणाऱ्या सभेची लिंक सभासदांना एस.एम.एस द्वारे पाठविण्यात येईल.**

**विशेष सूचना :**

१) गणसंख्ये अभावी ही सभा तहकूब झाल्यास पोटनियमातील तरतूदीप्रमाणे सदर सभा ठरलेल्या लिंकवर व्हीसी / ओएव्हीएम द्वारे (**Other Audio Visual Means**) ऑनलाईन पध्दतीने अर्ध्या तासाने घेण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासंदाना वार्षिक अहवाल / कामकाजासंबंधी काही सूचना विचारायाच्या असतील, त्यांनी आपले लेखी प्रश्न किंवा सुचना दिनांक १५.०३.२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत संस्थेच्या **shares@shivkrupa.in** या ईमेल आयडी वर किंवा **whatsapp** क्रमांक ९३२४९४४०६२ वर पाठवाव्यात.

३) महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभागाच्या दि.०८.०३.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची प्रक्रिया होणार आहे. ऑनलाईन उपस्थितीकरीता रविवार दि. २१.०३.२०२१ रोजी सकाळी ०८.३० वा. नंतर सभासदांनी कृपया लॉगीन करावे.

४) काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सभेचे कामकाज खंडित झाल्यास तांत्रिक त्रुटीचे निवारण झालेनंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल याची सभासदांनी नोद घ्यावी.

५) जे सभासद ई मेल आय डी, किंवा मोबाईल क्रमांकावर दि. १५ मार्च २०२१ पर्यंत नोंदणी करतील त्यांनाच लॉगीन आय डी व पासवर्ड एस. एम. एस द्वारे पाठवण्यात येईल.

६) ज्या सभासदांनी त्यांच्या मोबाईल क्रमांकासाठी **Do not Disturb** (**DND**) हा पर्याय निवडला असेल अशा सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी लॉगिन आय.डी. आणि पासवर्ड चा एस.एम.एस मिळू शकणार नाही. अशा सभासदांनी कृपया (**DND**) रद्द करावा.

७) ३८ वा वार्षिक अहवाल पतपेढीच्या **www.shivkrupapatpedhi.com** या संकेत स्थळावर सभासदांच्या माहितीकरीता उपलब्ध असेल.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने,
चंद्रकांत ह. शेळके
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कार्यलक्षी संचालक,

Poornay AMOL

# ★ सभासदांना ऑनलाईन सभेस उपस्थित राहणेकरीता सुचना ★

1. आपल्या रजिस्टर मोबाईल नंबर वर **SMS** व्दारे सभेस उपस्थितीकरीता नोंदणीसाठी लिंक पाठविण्यात येईल.
2. प्राप्त झालेल्या नोंदणी लिंक व्दारे आपण ऑनलाईन सभेकरीता नोंदणी करावी.
3. संस्थेच्या ऑनलाईन वार्षिक सभेसाठीची नोंदणी लिंक सभासदांसाठी दिनांक 19/03/2021 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
4. ज्या सभासदांनी व्हीसी(**Video Conferencing**) व्दारे होत असलेल्या ऑनलाईन सभेकरीता नोंदणी केलेली आहे अशा सभासदांना मेल / **SMS** व्दारे सभेची लिंक पाठविली जाईल.
5. वर्षिक सभेबाबत / विषयांबाबत काही प्रश्न असल्यास आपणास पाठविलेल्या लिंक मध्ये नोंदणी करताना आपले प्रश्न लेखी स्वरुपात कळवावे. त्या करीता स्वतंत्र रकाना देण्यात आलेला आहे.
6. सभेतील विषयांबाबत प्रत्यक्ष सभेच्या वेळी सभासदांस प्रश्न विचारावयाचे असल्यास **Raise Hand** या **Option** चा वापर करावा.
7. सदर सभेस व्हीसी(**Video Conferencing**) व्दारे उपस्थित राहण्या करीता आपल्या मोबाईल / लॅपटॉप / संगणक यामध्ये **Zoom App Install** असणे आवश्यक आहे.